# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## पोलीस शिपाई भरती २०२४-२०२५ प्रश्नपत्रिका

D

SET - D

Question Booklet Number
प्रश्नपुस्तिका क्रमांक

दिनांक : १५/०३/२०२६
कालावधी : ९० मिनीटे

एकुण प्रश्न : १००
एकुण गुण : १००

---

खालीलपैकी कोणत्या पर्यायामध्ये अव्ययसाधित विशेषण वापरले आहे ?

अ) पेटती ज्योत  ब) हसरी मुलगी  क) पुढची गल्ली  ड) पिकलेला आंबा

२) $(४^{४} \times ५^{x}) = ८०^{२}$ तर x = ?

अ) ४  ब) ३  क) २  ड) ५

३) एका वर्गातील ३० मुलांचे सरासरी वय १५ वर्षे आहे. त्या वर्गाच्या वर्गशिक्षकासह सरासरी वयात १.५ वर्षांची वाढ होते. तर शिक्षकाचे वय किती वर्षे आहे ?

अ) ५१.५ वर्ष  ब) ५१ वर्षे  क) ६० वर्षे  ड) ६१.५ वर्षे

४) एका डोंगरावर काही मेंढ्या व मेंढपाळ आहेत. मेंढ्या व मेंढपाळ यांच्या पायांची एकुण संख्या ९८ आहे व डोक्यांची संख्या २६ आहे, तर त्या ठिकाणी अनुक्रमे मेंढ्या व मेंढपाळ किती आहे ?

अ) २४, २  ब) २०, ६  क) २३, ३  ड) २७, १

५) एका सांकेतिक भाषेत NICE BOOK हा शब्द १२३४५६६७ असा लिहला. दुसऱ्या सांकेतिक भाषेत MOBILE ERA हा शब्द ०१२३४५५६७ असा लिहला. पहिल्या सांकेतिक भाषेतील CBI दुसऱ्या सांकेतिक भाषेत कसा लिहला जाईल ?

अ) IEB  ब) BIC  क) IBE  ड) EIC

Scanned with OKEN Scanner

६) खालीलपैकी कोणता विषय राज्यघटनेच्यां समवर्ती सुचीतील नाही.

अ) पोलीस  ब) वन  क) कामगार  ड) शिक्षण

७) १ जानेवारी १९९८ साली..... या पक्षाची स्थापना झाली.

अ) नॅशनल पिपल्स पार्टी  ब) राष्ट्रवादी कॉंग्रेस

क) बहुजन समाज पार्टी  ड) अखिल भारतीय तृणमूल कॉंग्रेस


८) योग्य पर्याय निवडा.

Vision Khaki

दागिने - सोने, सुई - ?

अ) शिवणे  ब) टोचणे  क) स्टिल  ड) दोरा

९) खालील आकृतीत एकुण किती त्रिकोण आहेत ?



अ) १६  ब) १७  क) १३  ड) ३०

१०) खालील मालिका पुर्ण करा.

१, ८, २७, ६४, ?

अ) ८०  ब) १००  क) १२१  ड) १२५

११) राम व शाम यांना मिळालेल्या गुणांचे गुणोत्तर ७:३ असे आहे. त्यांच्या गुणांमधील फरक १६ आहे. तर त्यांच्या गुणांची बेरीज किती ?

अ) ४०  ब) ३०  क) ५०  ड) ६०

Scanned with OKEN Scanner

१२) एक हापुस आंबा ५० रुपये या दराने रामभाऊने साडेचार डझन आंब्यांची ०१ पेटी खरेदी केली. त्यानंतर त्यांनी ती पेटी ३००० रुपयांस विकली. तर त्यांना शेकडा किती नफा किंवा तोटा झाला ?

अ) ११.११ टक्के तोटा
ब) १२.११ टक्के तोटा
क) ११.११ टक्के नफा
ड) १२.११ टक्के नफा

१३) विषाणुमुळे पुढील आजार होतो.

अ) गोवर
ब) कॉलरा
क) टायफाईड
ड) वरीलपैकी सर्व

१४) जर $p - q = 7,\ pq = 170,$ तर $p+q = ?$

अ) २१
ब) २७
क) ३५
ड) ३७

१५) भारतातील महारत्न दर्जा प्राप्त कंपन्या कोणत्या?

१) ONGC
२) BHEL
३) IOC
४) NTPC

अ) १ व २
ब) २ व ४
क) १ व ४
ड) वरीलपैकी सर्व

१६) खालीलपैकी कोणाला भारताचा राष्ट्रीय जलचर प्राणी म्हणतात

अ) खाऱ्या पाण्यातील मगर
ब) ऑलिव्ह रिडली समुद्री कासव
क) गंगा नदीतील डॉल्फिन
ड) ब्यू व्हेल

१७) ९७५६.१७ या संख्येतील ९ नंतरचा ७ व १ नंतरचा ७ यांच्या स्थानिक किंमतीमधील फरक किती ?

अ) ६९९.९३
ब) ६९९.३
क) ६९३
ड) ६८३

१८) ४५६५•२ या संख्येस ८ ने निःशेष भाग जातो. तर • च्या जागी कोणता अंक हवा ?

अ) ३
ब) ६
क) १
ड) ७



Scanned with OKEN Scanner

१९) खालीलपैकी कोणते जीवनसत्व कॅल्शियमच्या शोषणास मदत करते

अ) जीवनसत्व अ
ब) जीवनसत्व ब
क) जीवनसत्व क
ड) जीवनसत्व ड

२०) पासवर्ड संगणकाला सुरक्षितता प्रदान करतो त्यामुळे

अ) हार्डवेअरच्या जुनाटपणापासून संरक्षण होते
ब) सॉफ्टवेअरमधील त्रुटींपासून संरक्षण होते
क) संगणकामधील अनधिकृत प्रवेशापासून संरक्षण होते
ड) यापैकी नाही

Vision Khaki

२१) पुढील पैकी कोणते संशोधन केंद्र पुणे जिल्ह्यात नाही.

अ) केंद्रीय जलविद्युत संशोधन केंद्र
ब) राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी
क) महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था
ड) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

२२) खालील अपुर्णांक चढत्या क्रमाने लिहील्यावर मध्यभागी कोणता अपुर्णांक येईल ?

$\frac{3}{5}$ $\frac{4}{6}$ $\frac{5}{7}$ $\frac{3}{2}$ $\frac{8}{9}$

अ) $\frac{3}{5}$
ब) $\frac{5}{7}$
क) $\frac{4}{6}$
ड) $\frac{8}{9}$

२३) एका घड्याळाची किंमत १,८०० रुपये आहे. त्यावर प्रथम २० टक्के वाढ केली व वाढविलेली किंमत १० टक्क्यांनी कमी केली, तर आता घड्याळाची किंमत किती असेल ?

अ) २१६० रुपये
ब) १९४४ रुपये
क) २३४० रुपये
ड) १९८० रुपये

Scanned with OKEN Scanner

२४) ज्या व्यंजनांचा उच्चार करताना हवा अधिक प्रमाणात वापरली जाते त्या व्यंजनांना काय म्हणतात?

अ) संयुक्त व्यंजने

ब) महाप्राण व्यंजने

क) कंठी व्यंजने

ड) अल्पप्राण व्यंजने

२५) खालील म्हण पुर्ण करा.

**अन्नछत्री जेवून -----**

अ) मीठ मागणे

ब) पीठ मागणे

क) पाणी मागणे

ड) मिरपूड मागणे

२६) रुचिता उत्तरेकडे तोंड करुन उभी होती. ती उजवीकडे एकदा व डावीकडे दोनदा काटकोनात वळली, तर तिच्या उजव्या हाताला कोणती दिशा येईल?

अ) पुर्व  ब) पश्चिम  क) दक्षिण  ड) उत्तर

Vision Khaki

२७) खालीलपैकी कोणती संख्या मुळ संख्या नाही?

अ) १३  ब) ५१  क) ३७  ड) ५३

२८) सचिनने उद्योगासाठी बँकेकडुन ६०,०००/- रुपये कर्ज घेतले. ०४ वर्षानंतर त्याने ८०,४००/- रुपये बँकेला देवुन तो कर्जमुक्त झाला. तर बँकेचा व्याजदर किती ?

अ) ८ टक्के  ब) ७ टक्के  क) ६.५ टक्के  ड) ८.५ टक्के

२९) प्राजक्ता तिच्या बरोबर असलेल्या व्यक्तीची ओळख करुन देताना म्हणते की, याचा मामा माझ्या मामाला मामा म्हणतो. तर प्राजक्ताचे सोबतच्या व्यक्तीशी नाते काय ?

अ) आत्या व भाचा

ब) काकी व पुतण्या

क) आई व मुलगा

ड) बहिण व भाऊ

३०) परवा गुरुवार आहे, उद्या ०४ तारीख आहे, पुढच्या मंगळवारी किती तारीख असेल ?

अ) ०९  ब) १०  क) ०८  ड) ०५



Scanned with OKEN Scanner

३१) संध्याकाळी ०६.०० वाजता ग्रंथालयात वाचत बसले असताना, माझ्या डाव्या बाजुच्या भिंतीतील खिडकीतुन प्रकाश आत येत होता. जर ग्रंथालयाचे मुख्य प्रवेशद्वार पुर्वेस असेल, तर वाचताना माझे तोंड कोणत्या दिशेला असेल ?

अ) उत्तर ब) दक्षिण क) पूर्व ड) पश्चिम

३२) २५ चा ८ टक्के हा कितीचा ५० टक्के आहे ?

अ) ४ ब) ८ क) १६ ड) १२

३३) द.सा.द.शे. ७.५ % दराने एका रकमेचे ४ वर्षांचे व्याज ९६० रुपये येते. तर मुद्दलाची रक्कम किती ?

अ) ४५०० रुपये ब) ४००० रुपये

क) ३६०० रुपये ड) ३२०० रुपये

३४) जा, ये, कर, उठ, बस या मराठी भाषेतील मूळ धातुंना........ म्हणतात.

अ) साधितधातु ब) सिद्धधातु क) प्रायोजक ड) तत्सम शब्द

३५) ज्या वाक्यातील क्रियापदावरून केवळ काळाचा बोध होतो त्याला........ म्हणतात.

अ) आज्ञार्थी क्रियापद ब) स्वार्थी क्रियापद

क) विद्यार्थी क्रियापद ड) संकेतार्थी क्रियापद

३६) **'सांप्रत'** या क्रियाविशेषण अव्ययाचा प्रकार ओळखा.

अ) कालदर्शक ब) आवृत्तीदर्शक क) सातत्यदर्शक ड) प्रकारदर्शक

३७) एका विद्यार्थ्याच्या सहा विषयातील गुणांची सरासरी १२ आहे. पाच विषयात त्या विद्यार्थ्यास ८, १३, ९, १२ व ११ असे गुण आहेत. तर त्या विद्यार्थ्यास सहाव्या विषयात किती गुण आहेत ?

अ) १९ ब) २९ क) ११ ड) ०९

Scanned with OKEN Scanner

३८) आगगाडीला विमान म्हटले, विमानाला जहाज म्हटले, जहाजाला समुद्र म्हटले, समुद्राला आकाश म्हटले, आकाशाला सुर्य म्हटले, तर जहाज कोठे हाकारले जाईल?

अ) आकाश ब) समुद्र क) सुर्य ड) विमान

३९) अयोग्य जोडी ओळखा (ग्रंथ व ग्रंथकार)

अ) अष्टाध्यायी (व्याकरण) – पाणिनी

ब) चरक संहिता – चरक

क) नाट्यशास्त्र - भरतमुनी

ड) महाभाष्यम - महर्षी व्यास

४०) अयोग्य जोडी ओळखा.

Vision Khaki

अ) १९१७ – चंपारण्य आंदोलन

ब) १९१९ – जालियनवाला बाग हत्याकांड

क) १९३१ - सविनय कायदेभंग चळवळ

ड) १९४२ - भारत छोडो आंदोलन

४१) पुढीलपैकी कोणता संधी विग्रह चुकीचा आहे.

अ) श्रेयस्कर = श्रेयः+कर

ब) निस्तेज = निः +तेज

क) अंतःकरण = अंतर्+करण

ड) पुरस्कार = पुरस्+कार

४२) पुढील शब्दातील अनेक वचनी शब्द ओळखा.

अ) मंडळ ब) शेत क) पाखरु ड) पाणी

४३) चौरीचेरा येथे झालेल्या हत्येचा निषेध म्हणून महात्मा गांधींनी असहकार आंदोलन...... या दिवशी मागे घेतले

अ) ६ फेब्रुवारी १९२२


ब) ४ फेब्रुवारी १९२२

क) ४ मार्च १९२२

ड) ५ फेब्रुवारी १९२२

Scanned with OKEN Scanner

४४) खालील आकृतीत एकुण किती चौकोन आहेत ?



अ) ३८ ब) २४ क) ३६ ड) २२

४५) ९ डिसेंबर १९४६ रोजी पार पडलेल्या संविधान समितीच्या पहिल्या बैठकीचे हंगामी अध्यक्ष म्हणुन ...... यांनी कार्य बजावले

अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

ब) एस पी सिन्हा

क) राजेंद्र प्रसाद

ड) सी. राजगोपाल चारी

४६) पुर्ण वर्ग संख्येच्या एककस्थानी खालीलपैकी कोणता अंक कधीच नसतो ?

अ) ९ ब) ६ क) ४ ड) २

४७) सकाळी ०९.३० वाजता घड्याळातील तासकाटा व मिनीटकाटा यांच्यात किती अंशाचा कोन होईल?

अ) ९०° ब) १२०° क) १३५° ड) १०५°

४८) पाच मुले एका रांगेत बसलेली आहेत, राजेश हा संदीपच्या डाव्या बाजुला व संदेशच्या उजव्या बाजुला बसलेला आहे, विपुल हा संदेशच्या डावीकडे मात्र पवनच्या उजव्या बाजुला बसला आहे, तर दोन्ही कडेच्या बाजुला कोण बसलेले आहेत ?

अ) पवन व संदीप

ब) राजेश व संदेश

क) राजेश व विपुल

ड) पवन व विपुल

Scanned with OKEN Scanner

४९) अनिल हा सुनिलपेक्षा ७ वर्षांनी लहान आहे, दोघांचे वयांची बेरीज ४३ असल्यास 'अनिल' चे वय किती ?

अ) १८ ब) २५ क) ३३ ड) २८

५०) खालील वाक्यातील विभक्ती ओळखा.

**रामा, पाणी आण.**

अ) द्वितीया विभक्ती
ब) चतुर्थी विभक्ती
क) पंचमी विभक्ती
ड) संबोधन

Vision Khaki

५१) **चौदावे रत्न दाखवणे** म्हणजे काय?

अ) श्रीमंती दाखवणे
ब) मौजमजा करणे
क) मार देणे
ड) शक्तीचे प्रदर्शन करणे

५२) ई-लाख्यात वरून कोणता काळ ओळखला जातो?

अ) वर्तमानकाळ
ब) भुतकाळ
क) भविष्यकाळ
ड) रिती भविष्यकाळ

५३) १०० मीटर लांब व ८० मीटर रुंद आयताकृती मैदानाला चार पदरी तारेचे कुंपण करावयाचे आहे. तर एकुण किती मीटर तार लागेल ?

अ) ३६० ब) ७२० क) १४४० ड) १८०

५४) रघु रिक्षात बसला, तेव्हा मिटर भाडे १५ रुपये होते. त्यानंतर प्रत्येक किलोमीटरला ३ रुपयांची वाढ होते. जर रघुने २२ कि.मी. प्रवास केला, तर त्याने रिक्षावाल्याला किती रुपये भाडे द्यावे ?

अ) रुपये ६० ब) रुपये ७८ क) रुपये ८४ ड) रुपये ९०

Scanned with OKEN Scanner

५५) संकटग्रस्त सापडलेल्या प्राणी आणि वनस्पतींची नोंद ठेवण्यासाठी पुढीलपैकी कोणत्या बुक चा वापर करतात.

अ) पर्पल डाटा बुक
ब) रेड डाटा बुक
क) ऑरेंज डाटा बुक
ड) यलो डाटा बुक

५६) योग्य जोडी ओळखा.

अ) तापमान – केल्विन
ब) घनता – न्युटन
क) दाब - मीटर$^3$
ड) वरील पैकी १ व २

५७) **'खग'** या शब्दाचा समास ओळखा.

अ) अव्ययीभाव
ब) तत्पुरूष
क) द्वंद्व
ड) बहुव्रीही

५८) खालीलपैकी तद्‌भव शब्द ओळखा.

अ) शिपाई
ब) नदी
क) घाम
ड) वृक्ष

५९) खालीलपैकी कोणती जोडी चुकीची आहे.

अ) बटाटा - पोर्तुगीज शब्द
ब) कंदील - अरबी शब्द
क) शिपाई - इंग्रजी शब्द
ड) पिस्तुल – पोर्तुगीज शब्द.

६०) योग्य पर्याय ओळखा.

| | |
|---|---|
| ४ | ८ |
| ८० | |

| | |
|---|---|
| ६ | ९ |
| ११७ | |

| | |
|---|---|
| ७ | ३ |
| ? | |


अ) ५३
ब) ४९
क) ५८
ड) ४५

६१) २०११ च्या जणगणनेनुसार सर्वाधिक लोकसंख्येचे राज्य कोणते?

अ) महाराष्ट्र
ब) बिहार
क) उत्तरप्रदेश
ड) प.बंगाल

Scanned with OKEN Scanner

६२) योग्य पर्याय ओळखा.




अ) ७७ ब) ५८ क) ८७ ड) ६८

३) खालीलपैकी मध्यप्रदेश राज्यातील व्याघ्रप्रकल्प कोणता?

अ) बांधवगढ ब) सुंदरबन

क) सरिस्का वन्यजीव अभयारण्य ड) जिम कार्बेट

Vision Khaki

६४) चार अंकी मोठ्यात मोठी सम संख्या व तीन अंकी लहानात लहान विषम संख्या यांच्यातील फरक खालीलपैकी कोणता ?

अ) ९८८७ ब) ९८९७ क) ९८९८ ड) ९८९५

६५) एका दिवसांत एकुण किती मिनीटे असतात ?

अ) ३६०० ब) ७२० क) १४४० ड) १२४०

६६) **'शिपायाकडून चोर धरला गेला.'** वाक्याचा प्रयोग ओळखा

अ) नवीन कर्मणी प्रयोग ब) कर्तरी प्रयोग क) भावे प्रयोग ड) यापैकी नाही.

६७) **'तुरुंग'** हा शब्द कोणत्या भाषेतील आहे?

अ) अरबी ब) फारसी क) पोर्तुगीज ड) देशी

८) **आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे!** हे उदाहरण कोणत्या अलंकाराचे आहे?


अ) उपमा ब) उत्प्रेक्षा क) रुपक ड) अपन्हुती



Scanned with OKEN Scanner

६९) दिलेल्या शब्दांचे संच कोणत्या वेनआकृतीने दाखवता येतील.

**पाळीव प्राणी, १४ वर्षाखालील मुले, बाल कलाकार**




७०) वृद्धांसाठी अर्थसंकल्प मांडणारे पहिले राज्य

अ) तमिळनाडू　　ब) केरळ　　क) महाराष्ट्र　　ड) कर्नाटक

७१) शेतकऱ्यांनी शेते नांगरली <u>पण</u> पाऊस पडलाच नाही.

**'पण'** या उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.

अ) विकल्प बोधक उभयान्वयी अव्यय　　ब) परिणाम बोधक उभयान्वयी अव्यय

क) न्यूनत्व बोधक उभयान्वयी अव्यय　　ड) समुच्चय बोधक उभयान्वयी अव्यय

७२) **विधान** :- काही इंजिनिअर नोकरी करतात. पंकज इंजिनिअर आहे.

**अनुमान** :- **१) काही इंजिनिअर नोकरी करत नाही.**
**२) पंकज नोकरी करतो.**
**३) पंकज नोकरी करत नाही.**
**४) सर्व नोकरी करणारे इंजिनिअर आहेत.**

अ) फक्त अनुमान १ बरोबर　　ब) फक्त अनुमान २ बरोबर

क) अनुमान १ व २ बरोबर　　ड) सर्व बरोबर

७३) इराणमध्ये अडकलेल्या भारतीयांना सुरक्षितपणे मायदेशात म्हणजे भारतात परत आणण्यासाठी राबविलेली विशेष मोहिम

अ) ऑपरेशन कावेरी　　ब) ऑपरेशन अजय

क) ऑपरेशन स्वदेश　　ड) यापैकी एकही नाही.



Scanned with OKEN Scanner

७४) **'बरहुकुम'** हे शब्दयोगी अव्यय खालीलपैकी कोणत्या प्रकारातील आहे.

अ) व्यतिरेक वाचक ब) हेतु वाचक

क) योग्यता वाचक ड) विनिमय वाचक

७५) बँकेतील भरतीसाठी २० प्रश्नांची एक परीक्षा घेण्यात आली, त्या परीक्षेत प्रत्येक बरोबर येणाऱ्या उत्तरासाठी ०५ गुण मिळतात, तर प्रत्येक चुकलेल्या उत्तरासाठी ०२ गुण कमी होतात, पार्थने सर्व प्रश्न सोडविले त्यापैकी १० प्रश्नांची उत्तरे बरोबर आली, तर त्याला किती गुण मिळतील ?

अ) २० ब) ३० क) ५० ड) ८०

Vision Khaki

७६) दिलेल्या अक्षरांपैकी विसंगत गट ओळखा.

अ) CFIL ब) HKNQ क) UXAD ड) IKNP

७७) लयबद्ध अक्षरमाला मधील योग्य पर्याय निवडा.

a_db_acd_ba_dbb_cd

अ) cbbcb ब) cbacb क) cbbca ड) abcab

७८) खालील पैकी कोणता स्त्रोत अपारंपारीक उर्जा स्त्रोत नाही.

अ) पवन उर्जा ब) सौर उर्जा

क) कोळसा ड) भरती ओहोटी

७९) त्सांगपो व जमुना या नावाने ओळखली जाणारी नदी कोणती?

अ) गंगा ब) ब्रह्मपुत्रा क) सिंधू ड) कावेरी

८०) खालीलपैकी अशुद्ध शब्द कोणता?

अ) आशिर्वाद ब) परीक्षा

क) आध्यात्मिक ड) पोलीस

Scanned with OKEN Scanner

८१) पुढीलपैकी शुद्ध शब्द ओळखा

अ) कूतुहल

ब) कुतूहल

क) कुतुहल

ड) कूतूहल

८२) खालीलपैकी सर्वात लहान अपुर्णांक कोणता ?

अ) $\frac{7}{3}$ ब) $\frac{5}{6}$ क) $\frac{2}{5}$ ड) $\frac{3}{5}$

८३) एका सिनेमागृहात पहिल्या रांगेत २४ खुर्च्या आहेत. दुसऱ्या रांगेत २७ खुर्च्या, तिसऱ्या रांगेत ३० खुर्च्या आहेत. तरी एकुण ३० रांगा असल्यास एकुण किती खुर्च्या होतील ?

अ) २०२५ ब) २०१५ क) २००० ड) १९२५

८४) $\frac{8}{9} + \frac{17}{3} - \frac{23}{27} = ?$

अ) $\frac{154}{27}$ ब) $5\frac{18}{27}$ क) $\frac{144}{27}$ ड) $6\frac{19}{27}$

८५) **उंबराचे फुल** याचा अर्थ काय आहे?

अ) वेडा मनुष्य

ब) अतिहुशार व्यक्ती

क) अतिशय दुर्मिळ गोष्ट

ड) दुष्ट माणूस

८६) **उखळ पांढरे होणे** या वाक्प्रचाराचा अर्थ काय आहे?

अ) गरीबी येणे

ब) अचानक वैभव प्राप्त होणे

क) अतिश्रमामुळे दमुन जाणे

ड) यापैकी नाही.

८७) अंकमालिकेतील पुढील पर्याय निवडा.

८, २४, ४८, १४४, २८८, ?

अ) ५७६ ब) ३३६ क) ८६४ ड) ३७६

८८) जय व अजय यांच्या आजच्या वयाचे गुणोत्तर ३:५ आहे व त्यांच्या आजच्या वयांची बेरीज ६४ वर्षे आहे. तर चार वर्षांपुर्वी अजयचे वय किती होते ?

अ) २० वर्षे ब) ३६ वर्षे क) ३२ वर्षे ड) १६ वर्षे.

८९) एका वर्गातील २४ मुलांचे सरासरी वजन ४० आहे आणि ३६ मुलींचे सरासरी वजन ४५ आहे. तर संपुर्ण वर्गाचे सरासरी वजन किती होईल ?

अ) ४३ ब) ४२ क) ४५ ड) ४१

९०) भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७१ (एच) मध्ये पुढील राज्यासाठी विशेष तरतुद करण्यात आलेली आहे.

अ) मिझोराम ब) गोवा क) अरुणाचल प्रदेश ड) आसाम

९१) साक्षरता दर म्हणजे ....... वय असणाऱ्या साक्षर लोकांचे प्रमाण आहे.

अ) ६ वर्ष व त्यापेक्षा अधिक ब) ६ वर्ष

क) ७ वर्ष व त्यापेक्षा अधिक ड) वरील पैकी कोणताही नाही.

९२) राष्ट्रीय ग्राहक दिन ....... दिवशी साजरा केला जातो.

अ) २४ डिसेंबर ब) १४ डिसेंबर

क) १० डिसेंबर ड) २५ डिसेंबर

९३) विधान :- हुशार व्यक्ती विचारवंत आहेत. शास्त्रज्ञ हे हुशार व्यक्ती असतात.

**अनुमान :- १) शास्त्रज्ञ हे विचारवंत आहेत.**

**२) कोणतीही हुशार व्यक्ती शास्त्रज्ञ नाही.**

अ) अनुमान १ व २ बरोबर ब) फक्त अनुमान २ बरोबर

क) फक्त अनुमान १ बरोबर ड) अनुमान १ व २ दोन्ही चूक

Scanned with OKEN Scanner

९४) जर J K L M N O P Q हे आठ लोक एका गोल टेबलभोवती घड्याळ्याच्या काट्याच्या दिशेत समान अंतरावर चर्चा करत बसले असतील व P हा उत्तरेला बसलेला असेल, तर L हा कोणत्या दिशेस आहे ?

अ) उत्तर ब) दक्षिण क) पूर्व ड) पश्चिम

९५) **तिरपागडे होणे** याचा अर्थ काय आहे?

अ) आश्चर्यचकीत होणे ब) नाराज होणे

क) भलतेच काहितरी होणे ड) मर्यादा सोडणे

९६) **गाजरपारखी असणे** म्हणजे काय?

Vision Khaki

अ) सर्व विषयांत तज्ञ असणारा ब) कसलीच पारख नसणारा

क) शेतीचे ज्ञान असणारा ड) यापैकी नाही.

९७) नवीन गाळाचे संचयन होऊन निर्माण होणाऱ्या प्रदेशाला ....... म्हणतात.

अ) भाबर ब) खादर क) बांगर ड) तराई

९८) **'संवाद कौमुदी'** हे वृत्तपत्र कोणी सुरू केले?

अ) राजा राममोहन राय ब) गोपाळ गणेश आगरकर

क) बाळ गंगाधर टिळक ड) बाळ शास्त्री जांभेकर

९९) LINK : MKQO :: KARL : ?

अ) LCSN ब) LCUP क) LBNS ड) LCTU

१००) एका सांकेतिक भाषेत BRITISH हा शब्द CTLXISH , ENGLISH हा शब्द FPJPISH असा लिहिला तर त्याच सांकेतिक भाषेत SELFISH हा शब्द कसा लिहावा?

अ) TIFOJSHI ब) TGOJISH

क) TGNIISH ड) TFOIISH

S

TGO



Scanned with OKEN Scanner